# १) समाजसुधारक सावरकर यांचा पोवाडा

(शाहीर प्रभाकर जामखेडकर, मुंबई.)

—०)(०—

क्रांतीची भडकली ज्वाला। भरतखंडाला। झाला बोलबाला।
क्रांतीवीर सावरकर प्रख्यात। ज्यानं केली क्रांती समाजकारणात।
'प्रभाकर' धन्य कवन गाण्यात ॥धृ॥

सावरकर म्हणे एकदा। नाही मज चिंता। तुम्ही विसरता।
सागरामधलं माझं उड्डाण। सामाजिक विचारांचं उत्थान। विसरू नका,
माझी तुम्हाला आण ॥

चाल: रत्नागिरिला रत्न कोंडलं राजकारणावर बंदी।
समाजक्रांतीची नामी संधी, नव्या युगाची ही नांदी ॥
पहिली लढाई तिथे जुंपली, कर्मठशाही वृत्तीशी।
मुले शाळेमधि अलग बसण्याच्या, शिवाशिविच्या प्रश्नाशी ॥
मानवजाती एकच असता, भेदभावना कशास ही।
अस्पृश्यांना न्याय मिळाला, समानतेची ही सरशी ॥
बांधिली सुंदर, पतित पावन, मंदिर भागोजी कीर।
महार वा महाराज असो तो, पुजा कुणीही करणार ॥
रोटीबंदी हा जातीभेदाचा, प्रमुख ठरला आधार।
आधार खिळखिळा करण्यासाठी, सहभोजन हा निर्धार ॥
जातिजातिंची उच्चनीचता, नाही आम्हासी खपणार।
आंतरजातिय विवाहांनी, उच्चनीचता हटणार ॥

चाल: जातिभेद तोडण्यासाठी। किती केल्या त्यांनी खटपटी।
रुढी बसल्या आमच्या खनपटी। प्रगतीच्या नाही खुणगाठी।
तर्कशुद्ध विचार मांडूनी सुरू आघाडी ॥

चाल: चढविला हल्ला जोरदार। केला प्रहार। अज्ञानावर। लेखणीची केली....
त्यान तलवार।

लेखणीची केली त्यानं तलवार । सपासप केले रुढीवर वार ।
नव्या विचारांचा केला भडिमार ॥
लोकशाही आणि विज्ञान । शक्ती महादोन । प्रभाव संपन्न ।
शास्त्रीय संशोधनाचं फळ । आत्मसात करा विज्ञानाचं बळ ।
यंत्राची ठेवा हातामधे कळ ॥

चाल: धर्मभोळा समाज आपुला । अंधश्रध्दा त्याचे जोडिला ।
देवभोळेपणा वाढला । देवावर पुरता हावाला । मेहेनतीचा त्रास वाचला ।
प्रगतीची अपेक्षा कशी सांगा आम्हाला ॥
भूकंप कुठे जर झाला । पाऊस पडला नाही वक्ताला ।
पाण्यात बुडवून ठेवा देवाला । करा करा मोठ्या यज्ञाला ।
धन, धान्य, गूळ तूप, आहुती यज्ञ कुंडाला ॥
पसरली रोगाची साथ । बोकडाचा बळी देतात ।
वेडेपणा जुने भ्रम कवटाळून बसण्यात ॥

चाल: विज्ञानाचं वाढता बळ । अंधश्रध्दा काढिती पळ ॥
बुध्दीचे वाहता जळ । साफ धुवून काढिते मळ ॥
खोट्या नाट्या भ्रमाची धूळ । झटकावी तुम्ही तात्काळ ॥
धर्मभोळेपणाचा घोळ । घालणार आता किती वेळ ॥
चाल: तंत्रज्ञान करा अवगत । यंत्राशिवाय नाही धडगत ।
शस्त्रसज्ज करा भारत । हाच उपाय होण्या प्रगत । पोथीची सोडा संगत ।
विज्ञानाचा धरुनी हात । घोडदौड करण्याची जरुर आज देशात ॥
चाल: विश्वाच्या कल्याणासाठी । विज्ञानाची वापरा काठी ॥
बेकारी हटविण्यासाठी । यंत्रबळ बांधावे गाठी ॥
मिळवणी: सामाजिक क्रांतीची ज्वाला । फैले देशाला । कानाकोपऱ्याला ।
सावरकरी तत्त्वज्ञानाची धार । मूलगामी विचारांची तलवार ।
मान्य देशभर झाला स्वीकार ॥ संपूर्ण ।

—•—

मान्य
9/7/80